MHAK030108742022

493 Old City Akola

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १५.१२.२०२२ |
| नोंदविल्याची तारीख | : | १५.१२.२०२२ |
| निकाल तारीख | : | १०.०९.२०२४ |
| कालावधी | : | ०१ वर्ष ०८ महिने २५ दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्र.०३), अकोला यांचे न्यायालयात**

(पिठासिन अधिकारी कु. व्ही. पी. धुर्वे)

(दिनांकः–१०/०९/२०२४)

पहिली खबर क्रमांक :– ४९३/२०२२, दिनांक ०९.१०.२०२२.

पोलीस ठाणे :– जुने शहर, अकोला, जि. अकोला.

दोषारोप :– भारतीय दंड संहिता कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये.

**नि.फौ.ख.क्र .१५७७/२०२२. नि. क्र.१३.**

**अभियोग पक्ष** :– **महाराष्ट्र शासन,**
तर्फे जुने शहर पोलीस ठाणे, अकोला,
ता. जि. अकोला.

अभियोगपक्षा तर्फे :– श्रीमती व्ही. आर. खेरे, सहाय्यक सरकारी विधिज्ञ

**आरोपी** :– **१. दिपक सुभाष गुहे**
वय अंदाजेः–३० वर्षे, व्यवसायः– मजुरी,
**२. अमर गिरीधारी अग्रवाल (मयत)**
दोन्ही रा. राजुबाबा चौक, शिवसेना वसाहत,
जुने शहर, अकोला.

आरोपीतर्फे :– श्री.संतोष धोत्रे विधीज्ञ.

## परिशिष्ट भाग–ब
## (फौजदारी नियमावली भाग–६ मधील परिच्छेद क्र.४४(II) नुसार)

| | | |
|---|---|---|
| घटना घडलेची तारीख | :– | ०८.१०.२०२२ |
| प्रथम खबरी अहवालची तारीख | :– | ०९.१०.२०२२ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | :– | १५.१२.२०२२ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | :– | ३०.०८.२०२४ |
| साक्षीपुरावे आरंभ झालेची तारीख | :– | ३०.०८.२०२४ |
| न्यायनिर्णयाकरिता प्रकरण ठेवलेची तारीख | :– | १०.०९.२०२४ |
| न्यायनिर्णय घोषीत केलेची तारीख | :– | १०.०९.२०२४ |
| शिक्षेचा आदेश पारित केल्याची तारीख | :– | ––– |

## आरोपीचा तपशील

| अ. क्र. | नांव | अटक केल्याची तारीख | जामीन वर सोडल्याची तारीख | दोषारोपीत कलमे | निर्दोष किंवा दोषी | सुनावलेली शिक्षा | कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्याच्या वेळी अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १.<br>२. | दिपक सुभाष गुहे<br>अमर गिरीधारी अग्रवाल | समजपत्र<br>समजपत्र | ––<br>–– | भा.दं.वि. कलम २९४, ३२३, ५०४, ५०६. | निर्दोष | –– | –– |

## परिशिष्ट भाग–क
## (फौजदारी नियमावली भाग–६ मधील परिच्छेद क्र.४४(III) नुसार)

### अ. अभियोग पक्ष साक्षीदारांची यादी.

| अनु. क्र. | नांव | तपशिल |
|---|---|---|
| सा.क्र.१ | प्रेमकुमार हरिनारायण गावंडे(नि.क्र.१०) | फिर्यादी |

### ब. बचाव पक्ष साक्षीदारांची यादी.

| क्रमांक | नांव | तपशिल |
|---|---|---|
| –– | –– | –– |

### क . न्यायालयीन साक्षीदारांची यादी.

| क्रमांक | नांव | तपशिल |
|---|---|---|
| –– | –– | –– |

### अ. अभियोग पक्ष निशाणी यादी.

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| –– | –– | –– |

### ब. बचाव पक्ष निशाणी यादी.

| अनु क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| –– | –– | –– |

**क. न्यायलयीन निशाणी यादी.**

| अनु क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड. महत्वाची वस्तु.**

| अनु क्र. | महत्वाची वस्तु क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

# न्या य नि र्ण य

(पारित दिनांक १०.०९.२०२४ रोजी)

प्रस्तुत फौजदारी खटल्यामध्ये यातील आरोपीवर भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दंडनीय असलेले अपराध केल्याबाबत आरोप ठेवण्यात आले आहेत.

**२.** अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात असे की, दिनांक ०८.१०.२०२२ रोजी १९.३० वाजता राजुबाबा चौक, शिवसेना वसाहत, जुने शहर अकोला येथे फिर्यादी प्रेमकुमार हरिनारायण गावंडे हे मोटारसायकलने येउन थांबले असतांना आरोपी दिपक गुहे याने काहीही कारण नसतांना फिर्यादीचे मोटारसायकलला लाथ मारली, त्यावर फिर्यादीने जाब विचारला

असता दोन्ही आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करुन 'तुझ्या आईला झव' अशी शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण करत लोटलाट केली व मारण्याची धमकी दिली. म्हणुन फिर्यादीने आरोपीविरुध्द जुने शहर पोलीस ठाणे अकोला येथे फिर्याद दिली.

**३.** सदर फिर्याद पोलीसांनी गुन्हा क्रमांक ४९३/२०२२ अंतर्गत नोंदवली. त्या अनुषंगाने गुन्हयाचा तपास करतांना घटनास्थळ पंचनामा तयार केला व साक्षीदारांचे बयान नोंदवले. तपासाअंती आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अंतर्गत दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. दरम्यानचे काळात आरोपी क्र.२ हा मयत असल्याचे अभिलेखावर आल्यामुळे सदर प्रकरण त्याचेविरुध्द कमी करण्यात आले.

**४.** अभिलेखावरील तथ्यांच्या आधारे निशाणी क्र.०६ नुसार यातील आरोपी क्र.१ वर भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दोषारोप निश्चित करुन सदर दोषारोपाचा मजकुर यातील आरोपीला त्याचे बोलीभाषेत वाचून व समजावून सांगितला जो की, आरोपीने नाकबुल करुन प्रकरण पुढे चालविण्याची विनंती केली.

**५.** प्रस्तुत फौजदारी खटल्यामध्ये अभियोगपक्षा तर्फे ०१ साक्षीदार तपासण्यात आला. अभिलेखावरील पूरावा व नि.०९ वरील पूरसीसच्या अनुषंगाने नि.०१ वर आदेश पारित करुन अभियोगपक्षाचा पूरावा बंद करण्यात आला. अभिलेखावर आरोपीविरुध्द विपरित पुरावा न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ नुसार निवेदन वगळण्यात आले.

**६.** सदर फौजदारी खटल्यामध्ये अभिलेखावर आलेल्या संपूर्ण बाबी विचारात घेवून खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले. त्याबाबत माझे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे स्पष्ट करीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक ०८.१०.२०२२ रोजी १९.३० वाजता राजुबाबा चौक, शिवसेना वसाहत, जुने शहर अकोला येथे सार्वजनीक ठिकाणी आरोपीने मयत आरोपीसोबत संगनमत करुन फिर्यादीस तुझ्या आईला झव अशी सार्वजनीक ठिकाणी शिवीगाळ केली? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने मयत आरोपीसोबत संगनमत करुन फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचवली? | |
| ३. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने मयत आरोपीसोबत संगनमत करुन फिर्यादीला सार्वजनीक शांतता भंग करण्यास कारणीभूत ठरेल या हेतुने अश्लील शब्दात शिवीगाळ केली? | नाही. |
| ४. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला मारण्याची धमकी व फौजदारी पात्र धाकधपटशा केली? | नाही. |
| ५. | आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त केले. |

## –<u>का र ण मि मां सा</u>–

७. आरोपीवरील दोषारोप सिध्द करणेकरीता अभियोगपक्षाने फिर्यादी प्रेमकुमार हरिनारायण गावंडे यांना साक्षीदार क्र. १ म्हणून नि.क्र.१० वर तपासले आहे. आरोपीतर्फे त्याच्या बचावासाठी कोणताही साक्षीदार तपासण्यात आला नाही. अभियोगपक्षाकरीता सहायक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे वकील यांचे युक्तीवाद ऐकले.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ४ करीताः</u>**–

८. सर्व मुद्दे हे परस्परांशी निगडीत असल्यामुळे त्यांवरील कारणमिमेंसेची पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी एकत्र चर्चील आहेत. अभियोगपक्षाने आपले कथन सिध्द करण्यासाठी फिर्यादी प्रेमकुमार हरिनारायण गावंडे यांना साक्षीदार क्र.१ म्हणुन तपासले. त्यांचे साक्षीत असे आले आहे की, ते आरोपीला ओळखत असुन घटना किती वर्षापूर्वी घडली हे त्यांना आठवत नसुन आरोपी व त्यांची केवळ बोलचाल झाली होती. या व्यतिरिक्त आणखी काहीही झाले नव्हते. फिर्यादीने फिर्याद व प्रथम खबर अहवाल यांवरील त्यांची सहि

ओळखली परंतु त्यातील मजकुर माहित नसल्याचे सागीतले. सदर साक्षीदारास अभियोगपक्षाने फितुर घोषीत करुन त्याचा उलटतपास घेतला. परंतु आरोपीविरुध्द कोणतीही बाब अभिलेखावर आली नाही. फिर्यादीने आरोपी अमर अग्रवाल हा मयत असल्याचे सांगीतले तसेच आरोपीने सुध्दा त्याचेविरुध्द केस केल्याचे मान्य केले. फिर्याद सिध्द करण्यासाठी फिर्यादीच्या साक्षीचा लाभ झाला नाही.

**९.** आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने सिध्द करायला पाहिजे होते की, आरोपींनी फिर्यादीला अश्लील शब्दात शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिली. प्रस्तुत प्रकरणांत अभियोगपक्षाने तपासलेल्या फिर्यादी यांच्या पुराव्यात अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे फिर्यादीने कथन केले नाही म्हणुन घटना व फिर्याद सिध्द झाली नाही. अभियोगपक्षाने इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासला नाही. घटनास्थळ पंचनामा मान्य केल्यामुळे सिध्द झाला असला तरी आरोपीचा घटनेशी संबंध सिध्द झाला नाही. म्हणुन अभियोगपक्षास आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे

गुन्हा सिध्द करता आला नाही. त्यामुळे मी अशा निष्कर्षाप्रत येते व मुद्दा क्र. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्रमाक ०५ करिताः**

**१०.** मी या आधीच मुद्दा क्र.१ ते ४ साठी विश्लेषित केल्याप्रमाणे अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ अंतर्गत गुन्हा वाजवी संशयापलीकडे शाबीत केलेला नाही. या प्रकरणांत स्वतंत्र साक्षीदार तपासले नाही. प्रकरणातील तपासी अंमलदार तपासण्यात आले नाही. या सर्व बाबींचा फायदा आरोपीला दयावा लागेल, म्हणून आरोपी हा गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरला आहे. त्या अनुषंगाने मी खालील आदेश पारित करते.

## –: आ दे श : –

१. आरोपी क्रमांक १–दिपक सुभाष गुहे याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे दंडनीय गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामिन बंधपत्र व वैयक्तिक जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ४३७–अ ची पूर्तता म्हणून रक्कम रुपये १५,०००/– चा जामीन कदबा व त्याच रकमेचा एक जामीन दयावा.

(निकालपत्र खुल्या न्यायालयात घोषीत केले.)

Digitally signed by VIBHA PRAKASHRAO DHURVE
Date: 2024.09.12 16:49:55 +0530

दिनांकः १०.०९.२०२४.

(श्रीमती व्ही.पी. धुर्वे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
(न्यायालय क्र.०३), अकोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F file order/judgment are same, word to word, as per the original order/judgment.

| | |
|---|---|
| Name of the Steno | R. P. Khandare |
| Court Name | Smt. V. P. Dhurve,<br>3rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Akola<br>(Court No.3). |
| Date of order/judgment | 10.09.2024 |
| Order/judgment signed by the presiding officer on | 10.09.2024 |
| Order uploaded on | 12.09.2024 |